* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

वाशिम दि.१४.०७.२०१९

## दरोडयाच्या तयारीत असलेली टोळी पोलीसांच्या जाळयात, दोन पिस्टल जप्त स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

मा. पोलीस अधिक्षक वसंत परदेशी सा. यांनी वाशिम जिल्हा पोलीस दलाचा पदभार स्विकारल्या पासुन मालमत्तेचे उघड न झालेले गुन्हे उघड करण्यासाठी अपर पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार चव्हाण यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक शिवा ठाकरे, स्थानिक गुन्हे शाखा वाशिम यांनी मागील काही दिवसापासुन बरेच गंभीर स्वरूपाचे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

दिनांक १३.०७.२०१९ रोजी सहायक पोलीस निरीक्षक अतुल मोहनकर कार्यालयात हजर असतांना त्यांना गुप्त बातमीदाराकडुन बातमी मिळाली की संघपाल कांबळे रा.भिमनगर वाशिम हा त्याचे साथीदारासह रात्री दरम्यान दरोडा टाकणार आहेत व संघपाल हा त्याचे साथीदार सध्या माउली पेट्रोलपंपाचे समोरील मराठा दर्शन हॉटेल चे जुने इमारतीचे मागील बाजुस अंधारात एकत्रीत थांबले आहेत अशा खात्रीलायक मिळालेल्या बातमीवरून सदर ठीकाणी छापा मारून कायदेशिर कारवाई करण्याची योजना पोलीस निरीक्षक शिवा ठाकरे यांनी आखुन तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी सपोनि अतुल मोहनकर, अजयकुमार वाढवे, पोउपनि दिनकर गोरे, भगवान पायघन व त्यांच्या अधिपत्त्याखालील कर्मचारी यांचे वेगवेगळे पथक तयार करून मिळालेल्या गुप्त माहितीनुसार वाशिम रिसोड रोडवरील मराठा दर्शन हॉटेलचे जुन्या इमारतीजवळ सापळा रचुन अंधारात थांबुन असलेल्या संघपाल कांबळे व त्याचे साथीदारांवर छापा मारून ०५ इसमांना मोक्यावर रंगेहात पकडले. पकडलेल्या इसमांचे नाव

१. संघपाल भारत कांबळे रा.भिमनगर वाशिम २. उमेश महादेव वाघमारे रा.निमाजगा वाशिम, ,३. आकाश प्रभु पंडीत रा.गोरेगाव जि.हिंगोली ४. राहुल प्रकाश गायकवाड रा.केकतउमरा जि.वाशिम ५. हनुमान दाजीबा मुळे रा.माझोड ता.सेनगांव जि.हिंगोली असे असुन त्यांचे दोन साथीदार अंधाराचा फायदा घेवुन पळुन जाण्यात यशस्वी झाले. पकडलेल्या वरील ०५ इसमांकडुन १) दोन देशी बनावटीच्या पिस्टल व दोन जिवंत काडतुस कि.अ. १,२०,०००/– रू, २) मोबाईल ०४ नग कि.अ. २५,०००/– रू ३) एक पितळी मुळ असलेला एक चाकु कि. अ. २०० /– रू, ४) हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटरसायकल अ.कि. २५,०००/–रू, ५) एक मिरची पावडर चा पाउच कि.अ. २० रू, ६) एक लोखडी रॉड कि.अ.५० रू असा एकुण कि. १,७०,२७०/– रू. चे साहीत्य जप्त करण्यात आले. सदरची कार्यवाही दि.१३/०७/२०१९ ते दि.१४/०७/२०१९ रात्रीदरम्यान वाशिम ते रिसोड रोडवरील मराठा दर्शन हॉटेल चे जुन्या इमारती जवळ करण्यात आली. सदर प्रकरणी सपोनि अतुल मोहनकर यांचे फिर्यादीवरून वर नमुद आरोपीविरूध्द गु.र.नं. ३६१/१९ कलम ३९९, ४०२ भादंवि सहकलम ३, २५ आर्म अ‍ॅक्ट, व १३५ महा. पोलीस कायदा अन्वये गुन्हा नोंदवुन आज दि. १४.०७.२०१९ रोजी उपरोक्त गुन्हयातील आरोपींना वि. न्यायालयासमोर हजर केले असता त्यांचा दिनांक १८.०७.२०१९ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केला आहे. पकडलेले सर्व आरोपी पोलीस कस्टडी रिमांड मध्ये असुन गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि डी.डी. डाखोरे, पो.स्टे. वाशिम शहर हे करीत आहेत.

Thakare 14/07/19

(शिवाजी ठाकरे)
पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा वाशिम.